# महानिर्मितीचे राख उपयोगिता धोरण

**आमचा दृष्टीकोन :-**

- केंद्रीय पर्यावरण व वने खत्याच्या निर्देशानुसार महानिर्मितीच्या औष्णिक विदयुत केंद्रात निर्माण होणाऱ्या राखेचा १००% वापर करणे.

**आमचे ध्येये :-**

- पर्यावरण व्यवस्थापनाद्वारे राखेचा मुल्यवर्धित विनियोग वाढविण्यासाठी क्षमता विकसीत करणे.
- यासाठी प्रशिक्षण, कार्यशाळा, तांत्रिक चर्चासत्रे याद्वारे माहितीचा प्रसार करण्यासाठी अध्यावत तंत्रज्ञानाचा वापर करणे. टी.व्ही., रेडीओ, वर्तमानपत्रे, वेबसाईट इ. प्रसारमाध्यमाद्वारे राखेचा उपयोग व राखेपासुन बनवता येऊ शकणाऱ्या वस्तुंची प्रसिद्धी करणे.
- संशोधनाद्वारे सुरक्षित व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा विकास करून नवीन संकल्पनाद्वारे मोठया प्रमाणावर राखेचा वापर करण्यासाठी प्रयत्न करणे.
- पायाभूत प्रकल्पांच्या उभारणीमध्ये राखेच्या व राखआधारीत वस्तुंचा वापर करणे जेणे करून त्यांची उभारणी किफायतशीर होईल.
- संयुक्त कंपनीद्वारे विटा, सिमेंट इ. उत्पादने निर्माण करून राखेची उपयोगिता वाढवणे.

**कार्यक्षेत्र :-**

- राख उपयोगितेचे धोरण महानिर्मितीच्या सर्व औष्णिक विदयुत केंद्राना लागू राहील.

**मानव संसाधन :-**

- राख जमा करणे, वितरण तसेच सुयोग्य व्यवस्थापन करून वेगवेगळया माध्यमातून राखेचा बांधकामातील वापर वाढवण्यासाठी राख व्यवस्थापन करणाऱ्या संस्थेची गरज भासणे.
- महानिर्मिती सांघिक कार्यालय व सर्व औष्णिक विदयुत केंद्रामध्ये स्वतंत्र राख व्यवस्थापन विभाग स्थापन करून त्यास पुरेसे मनुष्यबळ व संसाधने उपलब्ध केले जाईल. याविभागाद्वारे राख व राखेवर आधारीत वस्तुंचे विपणन व विक्री केली जाईल. तसेच बांधाकामासाठी लागणाऱ्या अन्य वस्तूप्रमाणे राख व राख आधारीत वस्तुंची उपलब्धता ठेवली जाईल.
- चांगल्या कार्यपद्धतींची देवाण – घेवाण होण्यासाठी तसेच इतर बाबींची चर्चा होण्यासाठी क्रमवार पद्धतीचे त्रैमासिक बैठकींचे आयोजन प्रत्येक औष्णिक विदयुत केंद्रामध्ये करण्यात येईल.
- औष्णिक विदयुत केंद्रातील राख व्यवस्थापन विभाग राखेच्या विल्हेवाटेसाठी लागणाऱ्या खर्चाची देखभाल करेल.
- कोळशामधील राखेचे सरासरी प्रमाण विचारात घेऊन राख निर्मितीची एकुण मात्रा औष्णिक विदयुत केंद्रातील राख व्यवस्थापन विभागातर्फे ठरवण्यात येईल.

**राखेच्या उपयोगितेसाठी पायाभुत विकास करणे :-**

- केंद्रीय पर्यावरण व वने खात्याची दि. ०३/०४/२००७ च्या निर्देशानुसार राखेच्या विक्रीतून मिळणारी रक्कम ही वेगळया लेखाशिर्षामध्ये नोंद करणे. तसेच ही रक्कम राखेचा १००% विनियोग होई पर्यंत राखेच्या पायाभुत विकासासाठी वापर करणे.

- महानिर्मितीतर्फे सर्व औष्णिक विदयुत केंद्रामध्ये राख जमा करण्याची व्यवस्था करण्यात येईल. तसेच जमा केलेली राख ही ट्रक, ट्रेलर, बल्कर, रेल्वे वॅगनमध्ये भरण्यासाठी सोय करण्यात येईल.

- ट्रक, ट्रेलर, बल्करमध्ये भरलेल्या राखेचे वजन करण्यासाठी महानिर्मितीतर्फे वजन काटयाची सोय करण्यात येईल.

- राखेच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे ट्रक, ट्रेलर, बल्कर, रेल्वे वॅगन इत्यादींची वाहतूक व वजन यांच्यावर नियंत्रण व देख-रेख ठेवण्यासाठी महानिर्मितीतर्फे ERP प्रणालीचा वापर करण्यात येईल.

- राख भरण्याच्या ठिकाणी व आवक-जावक प्रवेशद्वारावर CCTV बसवण्यात येतील.

- काही अपवादात्मक वेळा वगळता राख भरणे व वाहतूक प्रक्रिया दिवसाचे २४ तास सुरु ठेवण्यात येईल.

- वाहनांची ये-जा सुरक्षीत होण्यासाठी रस्ते चांगले व सुस्थितीत ठेवण्यात येईल.

- वाहतूक सुलभ करण्यासाठी जेथे शक्य आहे तेथे रेल्वेद्वारे वाहतूक चालू करण्यात येईल.

- नविन होणारे राख बंधारे, त्याचे रस्ते, बांध, चर, पाट यांना राखेपासून तयार केलेल्या विटांचे अस्तर लावण्यात येईल.

राख वापरणाऱ्यांची माहिती :-

- प्रत्येक औष्णिक विदयुत केंद्र त्यांच्या कार्यक्षेत्रातील राख वापरणाऱ्यांची सुची व माहिती ठेवेल व ही माहिती वर्षातून २ वेळा अद्यावत केली जाईल.

राख विक्री :-

- केंद्रीय पर्यावरण व वने खात्याच्या २००९ च्या निर्देशानुसार महानिर्मितीतर्फे २०% राख विटा बनवणारे लघुउद्योग यांना देण्यात येईल. २०% कोटयातील उरलेली राख इतर उघोजकांना ठरलेल्या किंमतीत देण्यात येईल.

- विट उत्पादकांना २०% कोटयातील राख देण्याअगोदर त्यांच्या कारखान्यांची तपासणी, उत्पादन क्षमता, याची खातरजमा करण्यात येईल. तसेच राखेचा वापर हा फक्त दिलेल्या कारणासाठी होतो आहे किंवा नाही याची खात्री करण्यात येईल.

- राखेवरील विकास शुल्क याचे निर्धारण करण्यासाठी महानिर्मिती सांघिक कार्यालयातील राख व्यवस्थापन विभागाचे दोन प्रतिनिधी व संबधित औष्णिक विद्यत केंद्राचे दोन प्रतिनिधी यांची समिती स्थापन करण्यात येईल.

- राख उत्पादन आणि विनियोग याच्या माहितीचे संकलन करण्यासाठी संगणकीय व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्यात येईल. याच्या माध्यमातून राख उत्पादनाची मात्रा, गुणवत्ता याचे विश्लेषण करता येईल. त्यामुळे राखेची उपलब्धता व वापर यांची सांगड घालता येईल.

- राख विक्रीचा ठेका हा १२ ते ३६ महिने कालावधी करिता ठेवण्यात येईल व विक्री किंमत वाढवण्यासाठी आवश्यक ते कलम अंतर्भूत करण्यात येईल.

- जर ठेक्यात दिलेल्या मात्रेच्या ८०% पेक्षा जास्त राख उचलण्याचे उद्दिष्ट ठेकेदाराने सातत्याने ३ महिने पूर्ण केले नाही तर राख विक्रीचा ठेका रद्द करण्याचे कलम समाविष्ट राहील. पावसाळयामध्ये जुलै ते सप्टेंबर या कालावधीसाठी राख उचलण्याच्या मात्रेमध्ये सूट देण्याचे अधिकार संबधित औष्णिक विद्यत केंद्राच्या प्रमुखांना राहतील.

- ज्या ठिकाणी राख विक्रीच्या निविदेसाठी प्रतिसाद मिळाला नाही व राखेचा विनियोग अल्प आहे अशा औष्णिक विद्यत केंद्राच्या प्रमुखांना राख उचलण्यास इच्छुक असलेल्या इतर ठेकेदारांशी, सांघिक कार्यालयाच्या मान्यतेने थेट बोलणी व करार करण्याचा अधिकार राहील.

- दंडात्मक करवाईचे कलम व न्यूनतम विक्री किंमत ही प्रत्येक औष्णिक विद्युत केंद्राच्या क्षेत्रातील राखेच्या मागणीवर अवलंबून राहील.

- महानिर्मितीतर्फे २०% राखेच्या वीट उत्पादक यांना पायाभूत विकास शुल्क लावण्यात येईल. हे शुल्क प्रत्येक वाहनानुरूप म्हणजेच ट्रॅक्टर, ट्रक, बल्कर यासाठी वेग-वेगळे आकारण्यात येईल.

- राख उपयोगिता वाढवण्यासाठी सा.बां.विभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) तसेच विविध प्रकल्पासाठी महानिर्मितीतर्फे राख पुरविण्यात येईल. या विभागांच्या किंवा प्राधिकरणाच्या विविध निविदामध्ये, तांत्रिक तपशील, दरपत्रक यामध्ये राख व राखमिश्रीत बांधकाम साहित्य यांचा वापर करण्याविषयीचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**सध्या अस्तित्वात असलेले करार :-**

- नियुक्त केलेल्या ठेकेदाराकडून राख उचलण्याची टक्केवारी कमी झाल्यास सदर राख निर्धारित केलेल्या किंमतीत इतर ठेकेदाराला देण्याचा अधिकार महानिर्मितीस राहील. ठेकेदाराकडून कराराचे उलंघन झाल्यास करार रद्द करण्यात येईल.

**संयुक्त कंपनीद्वारे विटा,सिमेंट,इ. उत्पादने निर्माण करणे :-**

- राख उपयोगिता वाढवण्यासाठी प्रत्येक औष्णिक विद्युत केंद्र संयुक्त कंपनीद्वारे विटा,सिमेंट,इ. उत्पादने निर्माण करण्याची शक्यता पडताळून पाहिलं. योग्य/सक्षम कंपनीची निवड ही निविदा/खुली जाहिरात प्रक्रियेद्वारे करण्यात येईल.

- संयुक्त कंपनीचे स्वरूप, अटी व शर्ती स्वतंत्रपणे प्रकल्पाच्या व्याप्तीनुरूप ठरविले जाईल.

- राख उपयोगिता हा एक स्वतंत्र उद्योग समजून हा उद्योग प्रत्येक औष्णिक विद्युत केंद्रामध्ये राख बंधाऱ्याच्या परिसरात विकसित करण्यात येईल जेणे करून परिसरातील प्रकल्प ग्रस्त व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

**राख उपयोगितेसाठी संधी असलेले विविध क्षेत्रे :-क्स**

१) बांधकाम शेत्रात राखेपासून बनविलेल्या विटा, ब्लॉक्स,फरशी, सिमेंट,इ.चा वापर करणे.

२) राख वापरून जमिनीचा भराव करून वापरण्यायोग्य करणे, जमीन समतल करणे.

३) रस्ते, राख बंधारे, बांध, चर, पाट यांना राखेपासून तयार केलेल्या विटांचे अस्तर लावणे.

४) राखेचा उपयोग करून खारपाट जमिनीचा विकास.

५) सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभागा मार्फत रस्ते, धरणे, बंधारे, इ. राखेचा उपयोग करून बांधकाम व दुरुस्ती करणे.

६) गिट्टी खदान मधील खडडे बुजविण्याकरीता राखेचा उपयोग करणे.

७) उद्योग क्षेत्रातील इतर उपयोगासाठी राख वापरणे.

८) राखेतून तरंगणारी साळ वेगळी करून विक्री करणे.

**विशेष लक्ष्य देण्याजोग्या बाबी :-**

१) तंत्रज्ञानाचा वापर करून राख उपयोगितेची नवीन उत्पादने शोधणे.

२) मोठ्या प्रमाणात राखेचा वापर करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे.

३) राखेच्या वापरासंदर्भात प्रमाणके, मार्गदर्शक तत्वे व तपशील तयार करणे.

४) इतर शासकीय विभागाशी समन्वय साधणे.

५) प्रायोगिक स्वरूपातील संशोधनाचा व्यावसायिक तत्वावर वापर.

६) प्रशिक्षण, प्रात्यक्षिकेद्वारे प्रबोधन व विकास

७) प्रयोगिक तत्वावर सुरवातीस काही प्रकल्पाद्वारे तंत्रज्ञानाचे हस्तांतरण

८) वैधानीक मार्गदर्शक तत्वे आणि आर्थिक लाभ

९) माहिती आणि कौशल्याचा प्रसार करणे.

१०) भागधारकांचा सहभाग वाढवणे

११) वितरण व्यवस्थेचे व्यवस्थापन

१२) शासकीय सहभाग वाढवणे

**ठळक फायदे :-**

१) केंद्रीय पर्यावरण व वने खात्याच्या २००९ च्या निर्देशानुसार महानिर्मिती राखेचा १००% वापर करेल.
२) राखेचा पूर्ण वापर झाल्यामुळे राख बंधाऱ्यासाठी जमिन अधिग्रहीत करावी लागणार नाही.
३) ऊर्जा व पाण्याची बचत होऊन, राख व्यवस्थापनावर होणारा खर्च कमी होईल.
४) वेगवेगळ्या क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध होतील.
५) वीट उद्योगातील मातीचा वापर कमी होऊन जमिनीचे व मातीचे संवर्धन होईल.